अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय,

आस्थापना विभाग, पुणे मनपा.

जा.क्र. :- अतिमआ/साप्रवि/आस्था/ ५५४९

दिनांक :- ६/११/२०२०

-: आदेश :-

विषय :- **कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.**
कोरोना विषाणू प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेअंतर्गत विविध विभागाकडे उपलब्ध करून दिलेल्या शिक्षण विभाग (प्राथमिक) कडील उप शिक्षकांना कार्यमुक्त करणेबाबत

संदर्भ :-
१) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३.०३.२०२०
२) महाराष्ट्र कोव्हिड-१९ उपाययोजना नियम,२०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
४) कार्यालयीन आदेश जा.क्र.अति.मआ/साप्रवी/आस्था/५२११ दि.२६/१०/२०२० चे परिमंडळ क्र १ ते ५, क्षेत्रीय कार्यालय निहाय व , आपत्ती व्यवस्थापन विभाग **रोटेशन आदेश**
५) कार्यालयीन आदेश जा.क्र.अति.मआ/साप्रवी/आस्था/४७८० दि.०८/१०/२०२० चे शहर अभियंता (आपत्ती व्यवस्थापन कक्ष) बांधकाम विभाग, परदेशी नागरिक हॉटेल व्यवस्था, परिमंडळ व क्षेत्रीय कार्यालय निहाय पर्यायी सेवक विविध कामासाठी चे **रोटेशन आदेश**

पुणे महानगरपालिका हद्दीत सध्या कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढत आहे.त्याचा प्रसार होऊ नये यासाठी पुणे महानगरपालिका वेगवेगळया स्तरावर कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जात आहेत.

कोरोना विषाणू प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेअंतर्गत संदर्भ क्र ४ अन्वये परिमंडळ क्र १ ते ५, क्षेत्रीय कार्यालय निहाय, आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे रोटेशन नुसार प्राथमिक शिक्षण कडील शिक्षकांचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.तसेच संदर्भ क्र ५ अन्वये कोरोना विषाणू प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेअंतर्गत शहर अभियंता (आपत्ती व्यवस्थापन कक्ष) बांधकाम विभाग, परदेशी नागरिक हॉटेल व्यवस्था, परिमंडळ व क्षेत्रीय कार्यालय निहाय पर्यायी सेवक विविध कामासाठी विविध कामासाठी प्राथमिक शिक्षण विभागाकडील शिक्षकांना रोटेशन नुसार आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

प्राथमिक शिक्षण विभागाकडील शिक्षकांना कोरोना विषाणू प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक पाययोजनेअंतर्गत परिमंडळ क्र १ ते ५, क्षेत्रीय कार्यालय निहाय व शहर अभियंता (आपत्ती व्यवस्थापन कक्ष) बांधकाम विभाग, परदेशी नागरिक हॉटेल व्यवस्था, विभागाकडे विविध कामासाठी संदर्भ क्र ४ व ५ अन्वये नियुक्त केलेल्या शिक्षकांना या आदेशान्वये कार्यमुक्त करण्यात येत आहे. या आदेशानुसार कार्यमुक्त केलेल्या शिक्षकांनी **दिवाळी सणाच्या सुट्ट्या संपल्यानंतर** शैक्षणिक कामकाजासाठी नियुक्त केलेल्या शाळेत त्वरीत रुजू व्हावे व रुजू झालेबाबतचा अहवाल प्रशासकीय अधिकारी प्राथमिक शिक्षण विभाग यांचेकडे सादर करावा.